## ।। ॐ श्री साईराम ।।

## प्रश्न ७९

ना घाई ना चिंता

प्रश्नोत्तरांच्या सत्रात आपले स्वागत असो.

आपल्या परमप्रिय भगवानांच्या दिव्य कृपाशिर्वादामुळे, जगभरातील आपल्या श्रोत्यांकडून इतक्या मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या प्रतिसादासाठी मी सर्वांचा खूप आभारी आहे. यापुढेही अशीच जिज्ञासा जागृत ठेवा. भगवानांचे तुम्हाला कृपाशिर्वाद लाभो.

आजचा प्रश्न हा असा आहे. परमेश्वरप्राप्तीची आपण घाई करावी का? आपल्या ध्येयाप्रत पोहोचण्याची घाई करावी का? कारण आयुष्य संपत चाललंय. आपण थकत जातो आहोत. शेवट दृष्टिपथात आहे.

तर असा आहे प्रश्न! सध्याच्या काळात आपण जसे राहतो आहोत, त्यासाठी हा अगदी रास्त (योग्य) प्रश्न आहे. हे स्पर्धेचे युग आहे. सर्वदूर जीवघेणी (रॅट रेस) शर्यत आहे. कुठेही जायचं तर आपल्याला बस, ट्रेन, किंवा विमान पकडायची घाई असते. धावपळ, गडबड केल्याशिवाय मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचणे कठीण आहे. त्यामुळे, सध्या हे संपूर्ण जग घाई आणि चिंतेने ग्रस्त आहे. आपण घाईत असतो कारण... स्वामींनी अतिशय सुंदर शब्दात वर्णन केले आहे. मी स्वामींचे शब्द जसेच्या जसे आणि त्याचे भाषांतर देतो.

ह्या कलियुगात, क्षुद्र चढाओढ ही अगदी सामान्य बाब आहे.

आपण गतीमान राहिलो नाही, तर साहजिकच आपले काम बिघडेल.

होय! जर आपण वेग घेतला नाही, तर आपली बस चुकू शकते. आपल्याला धावपळ करावी लागेल, कदाचित आपल्या जाण्याचा उद्देश राहणार नाही.

सर्व आर्थिक व्यवहारासाठी आपल्याला धडपड करावी लागते.

ऑफिसला पोहोचण्यासाठी आपल्या धावपळ करावी लागते.

आपण वेग घेतला नाही, तर आपली सर्व कामे बिघडतील.

प्रतिष्ठेसाठी आपण जलद असतो.

बदला घेण्यासाठी पण लोकांना घाई असते.

बदला घेण्याची लोकांना घाई असते. आपण वर्तमानपत्रात, टीव्हीवर हेच पाहत असतो की कसे बदला घेण्याच्या प्रवृत्तीमुळे माणसाचा खून केला जातो.

होय, म्हणूनच जलद, वेगवान राहिल्याशिवाय, आपले काम, आपले कार्य यशस्वी होणार नाही.

आपण आपले जीवन कसे सदा घाईत व्यतीत करतो हे स्वामींनी उपहासात्मक, पण सुंदर पद्धतीने वर्णन केले आहे. पोहोचण्याची घाई. कामं पूर्ण करण्याची घाई. यशस्वी होण्याची घाई. जीवनात मी किती वेगाने प्रगती करू शकतो? मला बढती किती लवकर मिळू शकते? पैसे कसे जलद कमवू शकतो? होय! आपण नेहमीच घाई करतो.

म्हणूनच मला विचारला गेलेला प्रश्न हा या पार्श्वभूमीशी सुसंगत आहे. आध्यात्मिक क्षेत्रात घाई आवश्यक आहे का? धर्मात अथवा धार्मिक मार्गामध्येसुद्धा घाई गडबड करावी का? परमेश्वराप्रत पोहोचण्याची घाई का करू नये? तर असे आहेत सर्व प्रश्न.

कदाचित भौतिक पार्श्वभूमीवर आपल्या दैनंदिन जीवनशैलीला अनुसरून हा प्रश्न विचारला गेला असेल.

मी थोडं स्पष्टच बोलतो. तुम्हाला ऑफिसला पोहोचण्याची घाई असते कारण ते तुमच्या घरापासून दूर आहे. तुम्हाला बस पकडायची घाई आहे कारण बस स्टेशन तुमच्या घरापासून दूर आहे. तुम्हाला विमानतळ गाठायची घाई आहे कारण विमान सुटायची वेळ जवळ येत चलली आहे. म्हणजेच काय, गंतव्य जर दूर आहे, काळाशी निगडीत आहे. तिथे तुम्हाला गती वाढवायला हवी. तुम्ही जलद गतीने काम करायला हवे, नाहीतर वेळेवर पाहोचू शकणार नाही. तुमची बस, ट्रेन अथवा विमान जे काही आहे ते पकडू शकणार नाही.

तथापि, अध्यात्मात तुम्हाला अमुक एक ठिकाणी असं जायचं नसतं, तुम्हाला कुठे पोहोचायचे आहे? कुठेच जायचं नाही, मित्रांनो, कोणाकडेही जायचे नाही. कुठे पोहोचायचंय? कारण ते आत्ता, इथेच आहे. काळ आणि जागा यांचा काही संबंध नाही. तसेच, माझ्यासाठी मी जे ठरवलंय ते दुसरं काही नसून भ्रम आहे. निव्वळ भ्रम आणि मला भविष्यकाळात

वावरायचंय म्हणून मी घाई करतो.

खरे तर परमेश्वर आत्ता इथेच आहे. ध्येय वगैरे काही नसते. वेळ आत्ताच आहे. जागा पण हीच आहे. परमेश्वर आत्ता इथेच आहे याची जितकी अधिक खात्री पटत जाईल, तसे ते आपल्या हाडामासांत, रक्तात भिनायला हवे. हीच वस्तुस्थिती आहे, त्यामुळे त्याची खात्री पटायला हवी.

परंतु, आपल्याला स्वप्नात जगायचे असते. सतत स्वप्नात राहिल्याने काय होते? आपल्याला एक तर त्रास होतो, अथवा स्वप्न अपुरी राहतात. कधीही स्वप्न हे सत्य नसते. स्वप्न पाहणे म्हणजे आपले अमूल्य जीवन वाया घालवणे. आपण स्वप्नात आपले जीवन व्यर्थ घालवू नये. स्वर्ग कुठेतरी आहे. नंदनवन कुठेतरी आहे, कुठेतरी परमेश्वर आहे. त्याला जाणून घ्यायला वेळ हवा, मला त्याला प्राप्त करायचे आहे इ. किती वेळ लागेल? मला घाई करायला हवी का? घाई केली तर त्यात काय वाईट आहे इ. विचार करू नये.

मला क्षमा करा, पण परमेश्वर हे ध्येय आजिबात नाही. परमेश्वर आत्ता, इथेच आहे असे खात्रीने वाटेल, तेव्हा तुम्ही त्याची उपस्थिती अनुभवाल आणि आनंदी व्हाल. परंतु तो दूर आहे. त्याच्यापर्यंत पोहोचायचे आहे, असा विचार केलात तर तुम्ही दु:खी व्हाल. तुम्ही त्याला शोधत राहाल. प्राप्तीसाठी धडपड कराल. तथापि हे बरोबर नाही. कारण आपण परमेश्वराला ध्येय करून समस्या निर्माण करतो. ही आज आपल्या सर्वांसाठी एक मोठीच समस्या झाली आहे.

कधी कधी लोक म्हणतात, ‘‘मी जरा देवाकडे जाऊन येतो.’’ मंदिरात येताना ते म्हणतात, ‘‘मी स्वामींकडे जातोय, स्वामींच्या मंदिरात, भगवानांच्या मंदिरात जातो.’’ नाही नाही! जातो न म्हणता, तुम्ही म्हणायला हवे, ‘‘मी देवाकडे येतो! मी देवाकडे येतो!’’ याचा अर्थ असा होईल की परमेश्वर तुमच्यात आहे. तुम्ही स्वगृही परत येत आहात, इतकेच.

वस्तुस्थिती ही आहे की, तो तुमच्या अंतरात तुमच्यासाठी ताटकळतो आहे. त्याला जाणून घ्यायला तुमच्याकडे वेळ नाही. चौकशी करायला, चिंता करायला तुम्हाला वेळ नाही. म्हणून तुम्ही कल्पना करता की परमेश्वर लांब आहे आणि तुम्हाला त्याच्यापर्यंत पोहोचायचे आहे, त्याची प्राप्ती करायची आहे.

अशा प्रकारे तुम्ही सर्व गोष्टींची एक समस्या करता. हीच आपली चूक आहे. परमेश्वर आपली वाट पाहतो आहे. म्हणूनच ‘देवाकडे जातो’ न म्हणता ‘देवाकडे येतो’ असे म्हणणे अधिक योग्य आहे.

नंतर आपण डोक्यात एक खूळ घेतो की आपण प्रगती केल्याशिवाय आपल्याला परमेश्वरप्राप्ती शक्य नाही. मी काही विशिष्ट साध्य केल्याशिवाय मला त्याची प्राप्ती होणार नाही. माझ्या जीवनाचा स्तर उंचावत नाही, तोपर्यंत मला त्याच्या जवळ जाता येणार नाही. मी प्रगती करत नाही तोपर्यंत त्याच्या दिव्य उपस्थितीचा आनंद घेऊ शकणार नाही. अशा प्रकारच्यया विचारांनी आपण अस्वस्थ राहतो. मन:शांती मिळत नाही.

वस्तुस्थिती अशी आहे. जसे आपण आहोत तसेच राहू या, कोणताही बदल नाही, काहीच नाही! कारण तुम्ही आहात, हेच पुरेसे आहे. तुम्हाला बदलायचे नाही, तुम्ही आधीच दिव्य आहात.

अमृतस्यपुत्रा:

तुम्ही शाश्वतपुत्र आहात

ममै वांशो जीवलोके, जीव भूत: सनातन:

होय! तुम्ही शाश्वत आहात! तुम्ही दिव्यत्वाचा अंश आहात.

तुम्ही आहातच, तुम्हाला व्हायचे नाही. आपण जितके हे अधिक समजू, तितके लवकर आपल्याला जाणवेल आणि आपले जीवन अधिक चांगले होईल.

तसेच, स्वामींची प्रवचने पुन्हा पुन्हा वेळोवेळी ऐकल्यावर आपल्याला नक्कीच एक गोष्ट ठामपणे कळते की साधक हाच साध्य असतो. हे पहा! साधक हाच साध्य! निरीक्षक हेच निरीक्षण. आपण हे व्यवस्थित समजून घेऊ या. कारण शोधात एक इच्छा असते. तुम्हाला शोध घेण्याची गरजच काय? कारण तुम्ही स्वत: ईश्वर आहात. अहं ब्रह्मास्मि.

आपल्यापैकी ज्येष्ठ लोक समजतात की आता आम्ही वयस्कर झालो. वय होत जात आहे. आपण ज्येष्ठ नागरिक आहोत. त्यामुळे मनात एक भीती असते की आपल्याला वेळीच परमेश्वरप्राप्ती होईल की नाही? अशा विचाराने आपण निराश होतो. तशातच वयोपरत्वे उद्‌भवणाऱ्या समस्यांमुळे आपल्या मनात असाही विचार येतो की ईश्वरप्राप्तीचे उद्दीष्ट अशक्य आहे. हे पूर्णत: चुकीचे आहे. पण आपण का बरे भीती बाळगावी? भगवान म्हणतात, मी असताना भीती कशाची? (भय का बरे?)

जर ते तुमच्यामध्ये स्थित आहेत, तर भय का? भयाचे काही कारणच नाही. नैराश्य? आपण जराही निराश होऊ नये.

का? कारण ते आधीच तिथे आहेत. आपण कधीही कंगाल, दिवाळखोर नव्हतो. नाही! परमेश्वर तुमच्या अंतर्यामी आहे. तुम्ही ईश्वरात आहात. भगवान पुन्हा पुन्हा हेच सांगतात. ही अशक्यप्राय गोष्ट आहे असे जराही समजू नका कारण मूलत: हे उद्दीष्टच नव्हे. हे सर्वप्रथम समजून घ्या.

ठीक आहे, आपण म्हणू शकतो, ''मी खूप शिकलेला आहे. माझ्याकडे कितीतरी पदव्या आहेत. मला संशोधनाचा अनुभव आहे. यावर तुम्हाला काय बोलायचं आहे?'' मित्रहो, या सर्व शिक्षणामुळे तुम्ही अधिक महत्त्वाकांक्षी होता हे शिक्षण तुम्हाला परिणाम देणारे बनवते. थोडक्यात, ते तुम्हाला भ्रष्ट करतं, अहंकारी बनवते. त्यामुळे तुम्ही स्वत:ला देवापासून वेगळे समजता. म्हणूनच, शिक्षण हा काही निकष नव्हे, नक्कीच नाही!

आणि काहीजण म्हणतात, ''अरेरे! मी स्वामींना दुरावलो, मला स्वामींची आठवण येते!'' याला काही अर्थच नाही, कारण भजन असे आहे...

अंतरंग साई अनाथ नाथ साई
दीन बंधू साई करूणासिंधु साई
अंतरंग साई...

जर ते अंतर्यामी आहेत, तर मग तुम्हाला चुकल्यासारखे का वाटावे? 'मला स्वामींची आठवण येते' हे म्हणणे म्हणजे निव्वळ अज्ञान! ज्ञानाचा अभाव! तुम्ही त्यांच्यापासून दुरावूच शकत नाही. तुम्ही स्वत:पासून वेगळे आहात का? जर तुम्ही म्हणाल, ''मला माझी आठवण येते. मला आठवण येते... खूप आठवण येते!'' लोक म्हणतील, मानसोपचारतज्ज्ञाकडे जायची वेळ आली आहे.

म्हणूनच, परमेश्वर हे काही उद्दिष्ट नव्हे. त्याला हुकण्याचा प्रश्नच येत नाही. तो दुरावलाच नाही असे जेव्हा आपल्याला वाटते, तुम्ही गाताना, वाचताना, विचारात त्याची उपस्थिती जाणवते, तेच आत्मज्ञान आणि हे पूर्ण समजून घेणे हेच तर आत्मज्ञान.

आणि म्हणूनच, हे आत्मज्ञानही उद्दीष्ट नव्हे. तुम्ही आधीच आत्मज्ञानी आहात, इतकेच, फक्त समज असणे आवश्यक होते आणि या प्रक्रियेत, भौतिक मार्ग अथवा गोष्टींच्या संदर्भात विचार करू नये, कारण त्याने अध्यात्मात काही प्राप्ती होणार नाही. अथवा, काही गमावणारही नाही. तसेच, तुम्ही आत्मज्ञानी नाहीत असाही कधी विचार आणू नका. कदापि नाही! तुम्ही आधीच आत्मज्ञानी आहात. अमृतस्य पुत्रा:, शाश्वततेचे पुत्र, हे भविष्य नव्हे, तर हे वर्तमान होय.

कदाचित काही जण म्हणतील, ''मी प्रयत्न करून बघतो, अशा रीतीने प्रयत्न करून पाहतो. ''नाही! स्वामी नेहमी म्हणतात, ''प्रयत्न' कधीही म्हणू नका.'' ट्राय ट्राय म्हणालात की ते ड्राय (कोरडे) होते. यासाठी, तुम्ही ते करायलाच हवे.'' स्वामी असे म्हणतात.

त्यामुळे का? तुम्ही, मी का बरे घाई करावी? शेवटी काय? जीवन आनंदी आहे. जीवन ही एक आनंदाची गोष्ट आहे. आत्ता या क्षणाला मी भगवानांच्या जाणीवेत, भगवानांसोबतच्या अनुभूतीत मी आनंदात राहतो कारण मी शाश्वततेचा पुत्र आहे, ते माझ्या इथेच आहे, मला कुठेही जाण्याची आवश्यकता नाही आणि म्हणूनच आपण जीवन आनंदात व्यतीत करू शकतो.

लोक म्हणतात, ''तुम्ही अंतरात्म्यात डोकावा. कोण बरे आहे तिथे? कोणीही नाही. तुम्ही गात असताना, तुमम्हाला वाटते कोणीतरी तुमच्या अंतरात गात असते. नाही. तसे नाही. गाणे राहते तथापि तुम्ही तिथे नसता. नृत्य करताना, तुम्ही विचार करता, कोणीतरी तुमच्या अंतस्थ, नृत्य करीत आहे. तसे नाही! नृत्य मागे उरते, तुम्ही नाही.

म्हणूनच आपण हे समजून घेऊ या की अंतर्यामी कोणीही नाही. तुम्ही तो आनंद आहात, तुम्ही तो उत्सव आहात आणि ते नृत्यही. भगवानांच्या दिव्य कृपाशीर्वादाने ही जाणीव, ही समज आपल्यात यायला हवी.

खरं सांगायचे तर, केवळ आपला अहंकार, उद्दीष्टे निर्माण करतो. ठीक आहे! जरी आपण उद्दीष्ट गाठले तरी अहंकार शांत बसणार नाही. तो म्हणेल, ''अजून मोठी उद्दीष्टे आहेत. त्यामुळे उंच उंच क्रमाक्रमाने, आपण ध्येय, उद्दीष्टे लक्ष्य करीत गाठत जातो. त्यामुळे जीवनाचा आनंद गमावतो. अशा दिशेने विचार करणे चूक आहे. त्यामुळे, त्याची खोली समजून घेऊ या. यातच परिवर्तन आहे. भगवानांची आपणा सर्वांवर कृपा असावी.

साईराम

आभारी आहे..

**